कला अकादमीत सोमवारी अमर लता हा सांगीतिक कार्यक्रम

सोमवार दि. २ नोव्हेंबर रोजी कला अकादमीच्या ब्लॅक बॉक्स सभागृहात संध्याकाळी ६:०० वाजता अमर लता हा लता मंगेशकर यांच्या गाण्यांवर आधारीत विश्लेषणात्मक कार्यक्रम सादर होणार आहे. हा कार्यक्रम मुंबई येथील प्रसिद्ध गायिका डॉ. मृदुला दाढे सादर करणार आहेत. मृदुला दाढे या मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाच्या प्राध्यापिका आहेत. त्या पंडित गजाननबुवा जोशी, एस. के. अभ्यंकर, डॉ. आशा पारस्नेस यांच्या शिष्य आहेत. त्यांनी अनेक विषयांवर संशोधनात्मक कार्यक्रम सादर केले आहेत. त्यांनी लिहिलेल्या रहें ना रहें हम या पुस्तकाला अनंत फंदी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी अनेक संगीत कार्यक्रमाच्या संहिता लिहिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक तरूण गायक–गायिका सुगम संगीत शिकत आहेत.

सोमवारी त्यांच्या अमर लता या कार्यक्रमाला कीबोर्डवर विष्णू शिरोडकर, संवादिनीवर सुभाष फातर्पेकर, तबल्यावर रोहित बांदोडकर व ऑक्टोपॅडवर प्रकाश आमोणकर साथसंगत करणार आहेत.

डॉ. मृदुला दाढे यांचा हा सांगीतिक व संशोधनात्मक कार्यक्रम ज्यावर त्या स्वत: बोलणार व लता दीदींच्या काही गाणी सादर करून विश्लेषणात्मक कार्यक्रम रसिकांसमोर ठेवणार, त्यामुळे गोमंतकीय रसिकांना ही एक खास मेजवानी ठरेल. कला अकादमी तर्फे आयोजित हा कार्यक्रम सर्व रसिकांना खुला असून काही जागा राखीव आहेत.